| | | |
|---|---|---|
| | अहमदनगर जिल्हा परिषद<br>आरोग्य विभाग<br>जिल्हा प्रशिक्षण केंद्र अहमदनगर | |
| वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्र<br>दुरध्वनी क्रमांक वैयक्तिक :-<br>कार्यालय :- | ९४२२२३३५१०<br>०२४१-२४३०५४४ | जिल्हा प्रशिक्षण केंद्र<br>सिव्हिल हॉस्पिटल<br>कंपाऊंड,अहमदनगर |
| Email-id | dttnagar@rediffmail.com | |

जा.क्र./जिप्रके अ.नगर/वाहन दरपत्रके/६०४५-४७/२०२१ दि. २०/१०/२०२१
२५/१०/२०२१

प्रति,

.........................................

.........................................

.........................................

**विषय :- जिल्हा प्रशिक्षण केंद्र अहमदनगर या संस्थेसाठी वाहन भाडेतत्वावर घेणेबाबत दरपत्रक पाठविणेबाबत....**

**संदर्भ :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडील मंजुर टिपणी दि.०१/१०/२०२१**

उपरोक्त विषयान्वये जिल्हा प्रशिक्षण केंद्र अहमदनगर या संस्थेतील वैद्यकिय अधिकारी यांना प्रशिक्षणाचे मुल्यमापण करणेसाठी वं मा.प्राचार्य आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक यांचे सुचनेनुसार नाशिक येथे मासिक सभेसाठी तसेच मुंबई,पुणे येथे देखील वेळोवेळी सभेसाठी जाणे आवश्यक असते.

सन.२०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या मंजुर पीआयपी मध्ये सदर फिरतीसाठी जिल्हा प्रशिक्षण केंद्र व रुग्णालय प्रशिक्षण केंद्र यांना मिळुन रक्कम रु. १,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लक्ष पन्नास हजार मात्र) इतके अनुदान प्राप्त झोलेले आहे. सन. २०२१-२२ चा पीआयपी मंजुर पीआयपी नुसार खर्च करणेस मा.प्राचार्य नाशिक यांचेकडुन सुचना प्राप्त झालेल्या आहेत.

तरी जिल्हा प्रशिक्षण केंद्र अहमदनगर या संस्थेसाठी वैद्यकिय अधिकारी यांना फिरतीसाठी वाहन भाडेतत्वावर घेणे आवश्यक आहे. तरी आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे सदर वाहन भाडेतत्वावर घेणेसाठी स्थानिक व्यवसायिकांकडुन दरपत्रके मागविणेसाठी अनुमती मिळालेली आहे.

Scanned with CamScanner

तरी आपण आपल्या फर्मच्या नावे ए.सी सह व बिगर ए.सी.सहीत सदर तसेच मुक्कामाचे दर इ.सर्व दर भरुन दरपत्रक जिल्हा वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्र. अहमदनगर यांचे नावे बंद पाकिटामधुन आठ दिवसाचे आत वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद सिव्हील हॉस्पीटल कंपाउंड अहमदनगर यांचेकडे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन सादर करावे.

अटी व शर्ती खालील प्रमाणे.

१. वाहन भाडेतत्वावर देणेसाठी सदर वाहनाचे नॅशनल परमीट असणे आवश्यक आहे.

२. भाडेतत्वावरील वाहनाचा पुर्ण इनश्युरन्स भरलेला असणे आवश्यक आहे.

३. गाडीचे आर.सी.बुक असणे आवश्यक आहे.

४. वाहन धारकाचा परवाना आवश्यक आहे.

५. वाहनाची देखभाल,दुरुस्ती,इंधन,वंगण,टोल नाका,इतर खर्च किरकोळ स्वरुपाची कामे व वाहन चालकाचे वेतन व भत्ते इत्यादी सर्व खर्च वाहन धारकास करावा लागेल.

६)सदर दरपत्रक हे मंजुर झालेल्या दिनांकापासुन १ वर्ष कालावधीसाठी स्विकृतीस पात्र राहील.

७) बिल अदा करताना वाहनाचे किलोमिटर त्यात नमुद करणे आवश्यक आहे.

उपरोक्त सर्व कागदपत्रांची छायांकित प्रत दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या दराव्यतिरिक्त नंतर कोणतेही जादा आकार नंतर अदा केले जाणार नाहित याची नोंद घ्यावी.

(डॉ.संदिप सांगळे)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

**प्रत माहीतीस्तव सविनय सादर,**

- मा.प्राचार्य,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक
- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर

Scanned with CamScanner